# // प्रेसनोट //

सन २०२३ मधील हज यात्रेकरीता दि. २१ मे २०२३ पासून भारतातून यात्रेकरु जाण्यास सुरुवात होणार आहे. सदर यात्रेकरु सौदीअरेबिया तील मक्का, मदिना व जेदाह येथे भेट देतात.

राज्यातील २१,४५० यात्रेकरु (हज कमिटी ऑफ इंडिया यांच्याकडील नोंदणी नुसार) यात्रेसाठी जाणार असून मिरा भाईंदर मधील एकूण ३०० हज यात्रेकरुंची नोंदणी झाली आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. दिलीप ढोले यांच्या आदेशानुसार व शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दि २२ व २३ मे २०२३ रोजी भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरारोड येथे सकाळी १० ते दु. ४ या वेळेत हज यात्रेकरुंकरिता आरोग्य तपासणी शिबीर व लसीकरण सत्र आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबिरामध्ये हज यात्रेकरुंची मोफत आरोग्य तपासणी व लसीकरण केले जाईल. यामध्ये कोविड लस, ओरल पोलिओ लस, मेनिंजायटीस प्रतिबंधवक लस, तसेच ६५ वर्षा वरील यात्रेकरुंसाठी सिझनल इन्फयुएंझा लस देण्यात येणार आहे. सदर शिबिरामधील वैद्यकीय तपासणीत पात्र ठरणाऱ्या व आवश्यक सर्व लसी घेणाऱ्या यात्रेकरुंनाच हज यात्रेसाठी जाण्याची परवानगी मिळणार आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी हज यात्रेकरीता नोंदणी केलेल्या सर्व यात्रेकरुंनी सदर शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

(डॉ. नंदकिशोर लहाने)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका